# कृषि विज्ञान केंद्र,खरपुडी येथे रेशीम उद्योग प्रशिक्षणाचे आयोजन

जालना (दि.) जालना जिल्ह्यात तुती लागवडीखालील क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. ग्रामीण युकांसाठी रेशीम उद्योगातून रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण होत आहेत. ग्रामीण युवकांचे रेशीम उद्योग प्रशिक्षणासाठी वाढती मागणी लक्षात घेता कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी, जालना अंतर्गत ग्रामीण युवकांसाठी रेशीम उद्योग या विषयावर चार दिवसीय प्रशिक्षण दि. ६ ते ९ ऑगस्ट २०२४ दरम्यान आयोजित केले आहे. प्रशिक्षणामध्ये तुती लागवड पद्धत, तुती पाला उत्पादनासाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन, रेशीम कीटक संगोपन, रेशीम उद्योगातील यांत्रिकीकरण, रेशीम कीटकांचे कीड व रोग व्यवस्थापन इत्यादी विषयावर शास्त्रज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षनार्थींची जिल्हयातील यशस्वी रेशीम उद्योजक शेतकऱ्यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेट आयोजित करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी मर्यादित जागा आहेत. इच्छुक ग्रामीण युवकांनी प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी प्रत्यक्ष कृषि विज्ञान केंद्र, खरपुडी, जालना येथे येऊन दि.३१ जुलै २०२४ पर्यंत प्रशिक्षण नोंदणी अर्ज सादर करावा. या संधीचा फायदा जिल्हयातील ग्रामीण युवकांनी घ्यावा असे आवाहन कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.एस.व्ही.सोनुने यांनी केले आहे.